आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१९ नोव्हेंबर २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीसाठी उद्या होणाऱ्या मतदानाकरता अधिकारी-कर्मचारी मतदान केंद्रावर रवाना

- राज्यातल्या १ लाखांहून अधिक मतदान केंद्रावर ९ कोटी ७० लाखांहून अधिक मतदार बजावणार मताधिकार

- मतदानाच्या पार्श्वभूमीवर राज्यात विविध ठिकाणांहून पैसे वाटपाच्या तक्रारी

**आणि**

- ब्राझिलमध्ये सुरू असलेल्या जी ट्वेंटी बैठकीदरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची जागतिक नेत्यांशी चर्चा

**<><><><><>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठी उद्या सकाळी ७ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. त्यासाठी अधिकारी-कर्मचारी मतदान केंद्रांवर रवाना होत आहेत. राज्यात यंदा ९ कोटी ७० लाखांहून अधिक मतदार २८८ आमदारांना निवडून देणार आहे. त्यांच्यासाठी १ लाख ४२७ मतदान केंद्रं उभारली असून दुर्गम भाग वगळता इतर ठिकाणी सकाळी ७ ते संध्याकाळी ६ पर्यंत मतदान होईल. सर्वाधिक सुमारे साडे ८ हजार मतदान केंद्र पुणे जिल्ह्यात आहेत. त्यानंतर **मुंबई उपनगर, ठाणे**, या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी सव्वा ९ शे मतदान केंद्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत. **गडचिरोलीत** सुद्धा १ हजार पेक्षा कमी मतदान केंद्र आहेत. मतदारसंघाचा विचार करता सर्वाधिक ५७४ मतदान केंद्र **रायगड** जिल्ह्यात

**पनवेल** मतदार संघात आहेत. **खडकवासला, भोसरी, हडपसर, मुरबाड, नालासोपारा** वगैरे मतदार संघात मोठ्या प्रमाणात मतदान केंद्र आहेत. **मुंबईत वडाळा मतदारसंघात** सर्वात कमी म्हणजे २२३ मतदान केंद्र आहेत. **वरळी, माहिम, कुलाबा, मुंबादेवी** या मतदारसंघातही मतदान केंद्रांची संख्या अडीचशे पेक्षा कमी आहे. सर्वाधिक २६ मतदार संघ मुंबई उपनगर जिल्ह्यात असून त्यानंतर **पुणे, छत्रपती संभाजीनगर** यांचा क्रमांक लागतो.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी यंदा ४ हजार १३६ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात ३ हजार ७७१ पुरुष, ३६३ महिला आणि २ तृतीयपंथी आहेत.

**बीड** जिल्ह्यात माजलगाव मतदारसंघात सर्वाधिक ३४ उमेदवार रिंगणात आहेत. **पुणे** जिल्ह्यात सर्वाधिक ३०३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. सर्वात कमी १७ उमेदवार **सिंधुदुर्ग** जिल्ह्यात आहे. **उत्तर नांदेड** मतदारसंघामध्ये ३३, **जालन्यात भोकरदनमध्ये** ३२, **बीडमध्ये** ३१ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले आहेत. **नंदूरबार** जिल्ह्यातल्या **शहादा** मतदार संघात सर्वात कमी ३ उमेदवार रिंगणात आहेत. **सिंधुदुर्ग** जिल्ह्यात **कुडाळमध्ये** आणि **रायगड** जिल्ह्यात महाडमध्ये प्रत्येकी ५ उमेदवारांचं नशीब उद्या मतपेटीत बंद होईल. **नांदेड** लोकसभा पोटनिवडणुकीसाठीही उद्या मतदान होणार आहे आणि त्याठिकाणी १९ उमेदवार पात्र ठरले आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या २८८ मतदार संघांमध्ये १५८ पक्षांकडून २ हजार ५० उमेदवार रिंगणात आहे. उर्वरित २ हजार ८६ अपक्ष आहेत. सर्वाधिक २३७ उमेदवार बहुजन समाज पार्टीनं उभे केले असून वंचित बहुजन आघाडीचे २०० उमेदवार

रिंगणात आहेत. भाजपानं १४९, मनसेनं सव्वाशे, काँग्रेसनं १०१ उमेदवारांना निवडणुकीत उतरवलं आहे. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून ९५, शरद पवारांकडून ८६, एकनाथ शिंदेंकडून ८१, अजित पवारांकडून ५९ उमेदवार नशीब आजमावत आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाकडून ९३, महाराष्ट्र स्वराज्य पक्षाकडून ३२, प्रहार जनशक्तीचे ३८, माकपाचे ३, MIM चे १७, धर्मनिरपेक्ष जनता दलाचे ४, जनसुराज्य शक्तीचे ६, शेकापचे १८, समाजवादी पार्टीचे ९ आणि भाकपाचे २ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

**<><><><><>**

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत ६३ टक्क्यांपेक्षा जास्त आणि गेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यात ६१ पूर्णांक १ दशांश टक्के मतदानाची नोंद झाली होती. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ६१ पूर्णांक ३३ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. मतदानाचा हक्क बजावण्यात महिलांपेक्षा पुरुष आघाडीवर असल्याचा सर्वसाधारण कल आहे. मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांनी मतदारांना केलेलं आवाहन आता ऐकूया

**- होल्ड बाईट फणसाळकर**

यंदा मतदानाचं प्रमाण वाढावं यासाठी निवडणूक आयोग, स्थानिक प्रशासन, स्वयंसेवी संस्था यांनी विविध उपाययोजना केल्या आहेत. सर्वत्र मतदान केंद्रांची माहिती देणाऱ्या मतदान चिठ्ठ्या निवडणूक आयोगानं घरोघरी पोहोचवल्या आहेत. मुंबईत एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणात मतदान केंद्र असल्यानं विविध रंगांनी ही केंद्र सजवली आहेत आणि मतदान चिठ्ठ्यांवरही त्या रंगांचे स्टिकर लावले आहे. त्यामुळं मतदारांना त्यांचं मतदान केंद्र शोधणं सोपं होईल. मतदान केंद्रावर कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी रेल्वे, मेट्रोनं अतिरिक्त वेळासाठी सेवा उपलब्ध करुन दिल्या

आहेत. मुंबईत दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक मतदारांना त्यांच्या घराजवळून मतदान केंद्रापर्यंत जाण्यासाठी मोफत वाहन व्यवस्थेची सोयही आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी उद्या होणाऱ्या मतदानासाठी प्रशासनाने सर्व तयारी केली असून आवश्यक ती कार्यवाही केली जात आहे.

**नागपूर** जिल्ह्यातल्या मतदारसंघातल्या सर्व मतदान केंद्रावर निवडणूक कर्मचारी पोहोचले आहेत. सर्व केंद्रावर मतदानाची तयारी पूर्ण झाली असून सुरक्षेसाठी केंद्रीय सशस्त्र दल आणि पोलीस तैनात करण्यात आले आहेत.

**भंडारा** जिल्ह्यातल्या सर्व मतदान केंद्रावर मतदान यंत्र रवाना झाले आहेत. निवडणूक प्रक्रियेसाठी एसटी महामंडळाने १३४ बस सज्ज ठेवल्या आहेत. या गाड्यांमधून निवडणूक साहित्य मतदान केंद्रावर नेण्यात येत आहे. तसंच ५ हजार २३६ निवडणूक कर्मचारी आणि १४०० पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

**गोंदिया** जिल्ह्यातल्या बाराशे ८५ मतदान केंद्रावर निवडणूक साहित्य नेण्यात येत आहे. निवडणूक साहित्य नेण्यासाठी जिल्हा मुख्यालयात आज सकाळपासून गर्दी दिसून आली.

**नाशिक** जिल्ह्यातल्या ४ हजार ९२२ मतदान केंद्रासाठी २७ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान केंद्रावर विविध सुविधा देण्यात आल्या असून महिला मतदारांसाठी विशेष मतदान कक्ष उभारण्यात आले आहेत.

**धाराशिव** जिल्ह्यातल्या सर्व मतदान केंद्रावर निवडणूक कर्मचारी साहित्यासह रवाना झाले आहेत. निवडणूक प्रक्रियेसाठी सोळाशे पोलीस, साडे चौदाशे होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत.

**धुळे** जिल्ह्यातल्या सतराशे ५३ मतदान  केंद्रावर सर्व तयारी पूर्ण झाली आहे. जिल्ह्यातल्या १८ लाखापेक्षा जास्त मतदारांना मतदान माहिती चिठ्ठीचं वाटप केलं जात आहे.

**नांदेड** लोकसभा पोटनिवडणूक आणि विधानसभा निवडणुकीसाठीची तयारी पूर्ण झाली आहे.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात नालासोपाऱ्यामध्ये भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे पैसे वाटत असल्याचा आरोप बहुजन विकास आघाडी पक्षाने केला आहे. तावडे कथितरित्या पैसे वाटत असल्याचा व्हिडीओ प्रसिद्ध झाला आहे. बविआ कार्यकर्त्यांना असाच गैरसमज झाला आहे. तरीही कुणाचा काही आक्षेप असेल तर निवडणूक आयोगाकडून चौकशी व्हावी असा आपलाही आग्रही आहे, अशी प्रतिक्रिया तावडे यांनी दिली आहे.

याप्रकरणी भाजपा आणि तावडे यांच्यावर निवडणूक आयोगानं कारवाई करावी अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.
नोटबंदी झाल्यानंतरही एवढ्या मोठ्या प्रमाणात रोख रक्कम भाजपाच्या लोकांकडेच कशी येते असा सवाल खासदार सुप्रिया सुळे यांनी केला.

**<><><><><>**

नाशिक शहरातल्या पाथर्डी फाटा इथल्या एका तारांकित हॉटेलमध्ये शिवसेनेच्या जयंत साठे या नेत्याच्या कक्षातून १ कोटी ९८ लाख रुपये इतकी रोकड जप्त करण्यात आली. या प्रकरणाची चौकशी आयोगाने सुरू केली असून ही रक्कम आपल्या व्यवसायासाठीची असल्याची प्रतिक्रिया साठे यांनी दिली.

**<><><><><>**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या जवाहर नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पैसे वाटप होत असल्याचा आरोप विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. आमदार संजय शिरसाट यांच्या फोननंतर पोलिसांनी फक्त १८ लाखांची रक्कम जमा करून घेतली आणि अंदाजे दोन कोटींची रक्कम सोडण्यात आली, असा आरोप समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये दानवे यांनी केला आहे.

**<><><><><>**

नागपुरात पारडशिंगा इथं माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या गाडीवर काल रात्री दगडफेक झाली. या घटनेत देशमुख यांच्या डोक्याला मार लागला असून या प्रकरणाचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**हिंगोली** जिल्ह्यात कळमनुरी विधानसभा मतदारसंघातले वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. दिलीप मस्के यांच्या गाडीवर रात्री दगडफेक झाली. त्यांत डोक्याला मार लागल्यानं मस्के यांच्यावर नांदेडच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

ब्राझिलमध्ये रिओ-दी-जानेरो इथं सुरु असलेल्या जी ट्वेंटी बैठकीदरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जागतिक नेत्यांशी द्विपक्षीय बैठका केल्या. युरोपियन युनियनचे अध्यक्षांबरोबरच्या बैठकीत प्रधानमंत्र्यांनी भारत नेहमीच जगात सगळ्यांच्या भल्यासाठीच काम करत असल्यावर भर दिला. भूक आणि गरिबी याविरुद्ध ब्राझिलने जागतिक आघाडी उघडल्याबाबत त्यांनी प्रशंसा केली. शाश्वत शेती, सेंद्रीय शेती, भरडधान्य आणि हवामान-अनुकूल शेती ही भारताची उद्दिष्ट असल्याचं प्रधानमंत्र्यांनी स्पष्ट केलं. जागतिक स्तरावरच्या सर्वसमावेशक विकासासाठी भारताने राबवलेले डिजीटल कृषी अभियानासारखे नवोन्मेषक

कार्यक्रम मॉडेल म्हणून काम करतील, असंही प्रधानमंत्र्यांनी अधोरेखित केलं. पारंपारिक उपक्रम आणि आधुनिक तंत्रज्ञान यांच्या एकत्रीकरणानेच भूक आणि गरिबीशी लढता येईल, असंही मोदी यांनी नमूद केलं.

**//<><><><><>//**